| MHKO070000541997 | नियमित दिवाणी दावा क्र.१३०/१९९७ मधील<br>नि.क्र.२६८ वरील आदेश<br>(भास्कर उर्फ बाबासाहेब आत्माराम कांबळे आणि इतर<br>– विरुध्द –<br>मारुती सिध्दू कांबळे आणि इतर ) |
|---|---|

०१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. वादी यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र.१.२ प्रकाश मारुती कांबळे (नाईक) हे दि.०४/०२/२०२५ रोजी मयत झाले आहेत. त्यांना मृत्यूसमयी खालील प्रमाणे वारस आहेत.

| अ.नं. | वारसांचे नाव | मयताशी नाते |
|---|---|---|
| १. | श्रीमती बेगम प्रकाश नाईक<br>व.व.५५, धंदा – घरकाम<br>रा.नांदणी, (मातंग गल्ली जवळ), ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | पत्नी |
| २. | राहूल प्रकाश नाईक<br>व.व.२८, धंदा – शेती<br>रा.नांदणी, (मातंग गल्ली जवळ), ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | मुलगा |
| ३. | सौ.कोमल सचिन कांबळे<br>व.व.२५, धंदा – घरकाम<br>रा.नांदणी, (मातंग गल्ली जवळ), ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | मुलगी |

येणे प्रमाणे मयतास सरळ वारस असून प्रकाश मारुती कांबळे (नाईक) यांना

वरील अर्जातील अ.नं.१.२(१) ते १.२(३) असे कायदेशीर सरळ वारस आहेत. त्यामुळे मयत प्रकाश मारुती कांबळे यांचे नावासमोर मयत असा शेरा मारुन वरील वारसांना १.२(१), १.२(२) आणि १.२(३) असे नंबर देऊन निशाण १ मध्ये कायदेशीर प्रतिनिधी रेकॉर्डवर आणण्यासाठी आदेश करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** प्रतिवादीनी प्रस्तुत अर्जास योग्य तो आदेश पारित करणेत यावा असे म्हणणे दिले आहे.

**०५.** वादी आणि प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणातील कागदपत्रे पाहिली. प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापनाकरिता आणि वाटणीकरिता दाखल केलेला आहे. वादी यांनी मयत प्रतिवादी नं.१.२ प्रकाश मारुती नाईक यांच्या मृत्यू दाखल्याची मुळ प्रत निशाणी क्र.२६७ सोबत दाखल केलेली आहे. सदर मृत्यू दाखल्याचे अवलोकन करता मयत प्रतिवादी यांचे नाव प्रकाश मारुती नाईक असे दिसुन येते तसेच त्यांचा मृत्यू दि.०४/०२/२०२५ रोजी झाल्याचे दिसुन येते. दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २२ नियम ४ च्या तरतुदीचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, मयत प्रतिवादी नं.१.२ यांचे वारसांना सदरचा अर्ज चालविण्याचा अधिकार टिकुन राहीलेला आहे. वादी यांनी प्रतिवादी नं.१.२ यांच्या मृत्यूनंतर सदरचा अर्ज मुदतीत दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यातील मयत प्रतिवादी नं.१.२ चे अर्जात नमुद केलेले कायदेशीर वारस आहेत असे दिसुन येते. सदरचा दावा चालविण्याचा अधिकार मयत प्रतिवादी नं.१.२ यांचे वारसांना आहे. न्यायालयीन कार्यपध्दतीचे कायदे हे न्यायाच्या हेतूस्तव बनविण्यात आलेले आहेत. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास दावा गुणदोषावर निकाली काढण्यास मदत होणार आहे. वरील नमूद सर्व कारणांचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते –

## आदेश

१. प्रस्तुत अर्ज नि.२६८ मंजुर करण्यात येतो.

२. प्रस्तुत अर्जात नमुद केलेल्या वारसांना मयत प्रतिवादी नं.१.२ प्रकाश मारुती नाईक यांचे नावासमोर मयत असा शेरा मारुन त्यांचेखाली

१.२(१) श्रीमती बेगम प्रकाश नाईक

१.२(२) राहूल प्रकाश नाईक

१.२(३) सौ.कोमल सचिन कांबळे

वर नमुद वारस या नात्याने प्रतिवादी म्हणुन दाव्यामध्ये समाविष्ट होण्याची परवानगी देणेत येते.

३. वादी यांनी मुळ दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती या आदेशाच्या तारखेपासुन १४ दिवसांच्या आत करावी आणि सुधारीत दुरुस्ती प्रत दाखल करावी.

VANITA Digitally signed by VANITA Date: 2025.07.16 17:53:16 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA सत्यमेव जयते

**( व्ही.एम.कोळेकर )**

दि.१६/०७/२०२५

३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
जयसिंगपूर.